BODHIVRUKSHA JOURNAL OF DIVERSE DISCIPLINE (BJDD)

An Open-Access, Peer-Reviewed, Multidisciplinary Scholarly Journal | Bi-Monthly | Multilingual | Academic Research

Vol 2, Issue 6 (November-December 2026) (Special Issue 2) | ISSN: 3139-1486 (Online) | ISSN: 3139-9819 (Print)

केंद्र व राज्य शासनाच्या वनउपज व आदिवासी विकासासंदर्भातील योजनांचा अभ्यास

मयूर पंजाबराव राऊत

संशोधक, (अर्थशास्त्र विभाग)

शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्था(स्वायत्त) अमरावती

Email : mayurpatil2137@mail.com

डॉ.लक्ष्मण रा. म्हस्के

मार्गदर्शक, (अर्थशास्त्र विभाग प्रमुख)

शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्था(स्वायत्त) अमरावती

Email :dnyanlaksh81@gmail.com

सारांश.

भारत हा नैसर्गिक साधनसंपत्तीने समृद्ध देश असून वने, जलसंपत्ती, खनिजे, जैवविविधता आणि विविध वनउपज ही देशाच्या आर्थिक विकासाची महत्त्वपूर्ण साधने आहेत. भारतीय अर्थव्यवस्थेत वनसंपत्तीला पर्यावरणीय संतुलनासोबतच ग्रामीण व आदिवासी समुदायांच्या उपजीविकेच्या दृष्टीने विशेष महत्त्व आहे. महाराष्ट्र राज्यात सह्याद्री, सातपुडा आणि विदर्भातील विस्तृत वनक्षेत्रांमुळे साग, बांबू, तेंदूपत्ता, मध, लाख, डिंक व विविध गौण वनउपज उपलब्ध होतात. या नैसर्गिक संसाधनांवर राज्यातील अनेक आदिवासी कुटुंबांची उपजीविका, रोजगार आणि उत्पन्न अवलंबून आहे. तथापि, वनउपजाचे मर्यादित बाजारमूल्य, मध्यस्थांचे वर्चस्व, प्रक्रिया उद्योगांचा अभाव आणि विपणनातील अडचणी यांमुळे या संसाधनांपासून अपेक्षित आर्थिक लाभ मिळण्यात मर्यादा येतात. या पार्श्वभूमीवर केंद्र व महाराष्ट्र शासनाच्या वनहक्क कायदा, पेसा कायदा, वनधारित रोजगार, गौण वनउपज खरेदी आणि आदिवासी विकास योजनांचा अभ्यास करून वनसंपत्तीचे शाश्वत व्यवस्थापन, स्थानिक रोजगारनिर्मिती आणि आदिवासी समुदायाचा सर्वांगीण आर्थिक व सामाजिक विकास साध्य होणे अभिप्रेत आहे.

महाराष्ट्रामध्ये आदिवासी हा समुदाय सांस्कृतिक विविधता परंपरागत ज्ञान आणि या सोबतच निसर्गाशी जवळीक असल्या कारणाने नैसर्गिक संसाधानाशी समर्पित असणारे जीवन या गोष्टींसाठी पूर्वीपासूनच ओळखला जातो.

दाट जंगल, दुर्गम डोंगररांगा, मर्यादित पायाभूत सुविधा आणि पारंपरिक शेती यांवर आधारित जीवनमानामुळे या समाजाच्या आर्थिक व सामाजिक विकासात अनेक अडथळे निर्माण झाले आहेत. आरोग्य सेवा अपुरी, शैक्षणिक मागासलेपण,अपुरा रोजगार, वनहक्कांचे प्रश्न आणि बाजारपेठांपर्यंत पोहोच नसणे ही येथे मुख्य आव्हाने आहेत. अशा परिस्थितीत केंद्र आणि राज्य शासनाने आदिवासी समाजाच्या सर्वांगीण प्रगतीसाठी अनेक योजना व प्रकल्पांची अंमलबजावणी केली आहे. केंद्र शासनाच्या

BODHIVRUKSHA JOURNAL OF DIVERSE DISCIPLINE (BJDD)
An Open-Access, Peer-Reviewed, Multidisciplinary Scholarly Journal | Bi-Monthly | Multilingual | Academic Research
Vol 2, Issue 6 (November-December 2026) (Special Issue 2) | ISSN: 3139-1486 (Online) | ISSN: 3139-9819 (Print)

वनबंधू कल्याण योजना, MFP-MSP (वनउपज किमान समर्थनभाव) योजना, वन हक्क योजना कायदा, वन धन योजना, आदिवासी महिला साक्षमिकरण पंतप्रधान आदिवासी उन्नत ग्राम विकास योजना यांसारख्या उपक्रमांनी आर्थिक सुरक्षा, यांना बळकटी प्रदान केली आहे. राज्य शासनानेही आदिवासी उपयोजना (TSP), जंगलहक्क कायदा अनुदान योजना, महिला सक्षमीकरण योजना आणि वनउपज मूल्यवर्धन कार्यक्रम यांद्वारे आदिवासी समाजाच्या विकासासाठी लक्ष केंद्रित केले आहे.

एकंदरीत वनआधारित अर्थव्यवस्था ही आदिवासी समुदायाच्या सर्वांगीण आर्थिक व सामाजिक विकासाची महत्त्वपूर्ण आधारशिला आहे. केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजना, वनहक्क कायदा, पेसा कायदा, गौण वनउपजासाठी किमान आधारभूत किंमत, वनधन विकास केंद्रे, रोजगारनिर्मिती आणि आदिवासी महिला सक्षमीकरणाच्या उपक्रमांमुळे आदिवासी समाजाच्या आर्थिक स्वावलंबनासाठी महत्त्वपूर्ण संधी उपलब्ध झाल्या आहेत. तथापि, या योजनांचे वास्तविक यश प्रभावी अंमलबजावणी, निधीचा पारदर्शक व परिणामकारक वापर, वनउपजाचे मूल्यवर्धन, बाजारपेठेतील थेट सहभाग आणि स्थानिक समुदायाच्या निर्णयप्रक्रियेतील सक्रिय सहभाग यांवर अवलंबून आहे. त्यामुळे आदिवासी समाजाला केवळ शासकीय योजनांचा लाभार्थी न मानता नैसर्गिक साधनसंपत्तीचा संरक्षक, उत्पादक आणि स्थानिक अर्थव्यवस्थेचा सक्रिय घटक म्हणून सक्षम करणे आवश्यक आहे. वनसंपत्तीचे शाश्वत संवर्धन, आर्थिक लाभांचे न्याय्य वितरण आणि शिक्षण, आरोग्य, रोजगार व महिला सक्षमीकरण यांचा समन्वय साधल्यास आदिवासी समुदायाचा सर्वसमावेशक,आणि शाश्वत विकास साध्य होऊ शकतो, हा प्रस्तुत संशोधनाचा प्रमुख हेतू आहे.

बीज शब्द:- आदिवासी समाज, वनउपज, कौशल्य प्रशिक्षण, शाश्वत विकास,पेसा

प्रस्तावना.

देशाच्या परिपूर्ण विकासात्मक अर्थव्यवस्थेच्या पायाभरणीसाठी शासकीय धोरणे आणि शाश्वत विकासासाठी सामाजिक शैक्षणिक व आर्थिक सर्व समावेशक विकास साध्य करणे हा केंद्र सरकारचा महत्त्वाचा राष्ट्रीय मुद्दा ठरला आहे. त्या अनुषंगाने आदिवासी समाजातील व्यक्तींचा आर्थिक व सामाजिक विकास वत्या विकासाच्या योजनेच्या ध्येय धोरणाच्या अंमलबजावणी होऊन ते सर्व समाजातील घटकापर्यंत कशा पोहोचतील यासाठी शासनाने प्रत्यक्ष क्षेत्रासाठी स्वयंपूर्ण योजनेची आखणी व महत्त्वाच्या गोष्टी केली आहे. जो समाज शहरापासून दूर आहे तो समाज निसर्गाच्या सानिध्यामध्ये फक्त वनांवर आपलं उदरनिर्वाह करतो अशा या आदिवासी समुदायाचा विकास कसा साधता येईल याकडे शासनाचे विशेष लक्ष आहे. आदिवासी समुदायाच्या विकासासाठी राबविण्यात येणाऱ्या योजनेची अंमलबजावणी करून या आदिवासी समुदायाचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी केंद्रीय मंत्रिमंडळात स्वातंत्र्य आदिवासी मंडळाची स्थापना सुद्धा केली आहे. आणि त्या अनुषंगाने वेगवेगळ्या योजनांच्या माध्यमातून या आदिवासी समाजाच्या विकासाला चालना देण्याचा निर्धार करून तो पूर्णत्वास नेण्याचा संकल्प प्रशासनाने हाती घेतला आहे.

भारतीय संविधानात आदिवासींना अनुसूचित जमाती असे संबोधले आहे एका विशिष्ट भूप्रदेशात राहणारा समान सांस्कृतिक जीवन जगणाऱ्या समाजात आदिवासी समाज असे म्हणतात आदिवासींच्या राज्य लोकसंख्येच्या प्रमाणामध्ये असे दिसून येते की २०११ च्या जनगणनेनुसार महाराष्ट्रातील आदिवासींची संख्या राज्याच्या एकूण लोकसंख्येच्या ९.३५% एवढी साधारणतः १ कोटी ५ लाख १० हजार दिसून येते. आणि संपूर्ण देशाच्या आदिम समाजाच्या लोकसंख्येच्या ५.१% आदिवासी हे फक्त महाराष्ट्र राज्यामध्ये राहतात आणि महाराष्ट्र हे दुसऱ्या नंबरचे राज्य आहे. वनपरिक्षेत्रामध्ये राहून स्वतःचा उदरनिर्वाह व अर्थार्जन करणे आदिवासी समुदायाचे विशेष महत्त्वाचे कार्य आहे.

BODHIVRUKSHA JOURNAL OF DIVERSE DISCIPLINE (BJDD)
An Open-Access, Peer-Reviewed, Multidisciplinary Scholarly Journal | Bi-Monthly | Multilingual | Academic Research
Vol 2, Issue 6 (November-December 2026) (Special Issue 2) | ISSN: 3139-1486 (Online) | ISSN: 3139-9819 (Print)

स्वातंत्र्यानंतर भारत सरकारने आदिवासींच्या सर्व समावेशक प्रगतीसाठी अनेक योजनांची अंमलबजावणी करून विशेष सवलती देव केले आहे त्यामध्ये वन हक्क कायदा, पेसा कायदा, आश्रम शाळा वसतिगृह आदिवासी शिष्यवृत्ती आर्थिक उद्योग प्रशिक्षण शिबिर,अशा विविध विकासाच्या योजना शासनाने या आदिवासी समाजासाठी राबवतो आदिवासींच्या सामाजिक व आर्थिक प्रगतीसाठी केंद्र सरकार व राज्य सरकार देशाच्या आदिवासींचा विकास व्हावा त्या अंतर्गत आदिवासी विकास महामंडळाची स्थापना केंद्र शासनाच्या अंतर्गत करण्यात आली.

या समुदायाच्या आर्थिक व सामाजिक विकासासाठी सर्वात मोठा वन हक्क कायदा २००६ लागू केला आणि या कायद्याअंतर्गत सरकार प्रशासन व आदिवासी मंत्री हे आदिवासींना जमीन देण्याचा कायदा किंवा वनाधिकार असे सुद्धा आपल्या शासकीय धोरणात समाविष्ट करण्यात महत्त्वाचा भर दिला आहे या कायद्यामुळे आदिवासी समुदायाचे जीवन निसर्गावर जंगलावर आधारित असल्याने त्यानुसार त्यांच्या वस्तीसाठी आदिवासी समाजाला राहत्या ठिकाणी रोजगाराच्या संधी उपलब्ध करून दिल्या त्यासोबतच त्यांचे स्थलांतरण रोखण्यासाठी राष्ट्रीय रोजगार हमी कायद्याचे प्रभावी अंमलबजावणी करून त्या योजनेमधील खऱ्या अर्थाने त्यांचा विकास भरभराटीने व्हावा हा सकारात्मक दृष्टिकोन शासनाला अभिप्रेत आहे सोबतच आदिवासी तरुणांना उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती जर मोठ्या प्रमाणे देऊ केल्या तर त्यांच्या शैक्षणिक प्रगतीला हातभार लागेल.लघुउद्योग निर्मिती करण्यासाठी आदिवासींना प्रशिक्षण दिले व त्या माध्यमातून प्रोत्साहित केले तर त्यांचा आर्थिक उदरनिर्वाहाचा प्रश्न सुद्धा मार्गी लागेल.

खऱ्या अर्थाने या समाजाची उन्नती करायची असेल तर स्थानिक पातळीवर शासकीय योजना व्यवसाय प्रशिक्षण रोजगार शासकीय नोकऱ्या वनहक्क कायदा व त्याची अंमलबजावणी राष्ट्रीय रोजगार हमी कायदा कौशल्य विकास योजना घरकुल योजना आदिवासींना जमिनी वाटप व सोबतच महत्त्वाचा मुद्दा म्हणजे पेसा कायदा व केंद्र व राज्य शासनाच्या अंतर्गत आदिवासी विकासाच्या योजना राबवून या घटकांचा विकास दिवसेंदिवस साध्य होताना आपल्याला दिसून येतो.

भारत, महाराष्ट्र आणि विशेषतः विदर्भाच्या संदर्भात वनसंपत्ती ही आदिवासी समाजाच्या उपजीविकेचा, रोजगाराचा आणि आर्थिक विकासाचा महत्त्वपूर्ण आधार आहे. तेंदूपत्ता, बांबू, मोहफुले, मध, डिंक आणि इतर गौण वनउपजांच्या माध्यमातून आदिवासी समुदायाला उत्पन्ननिर्मितीच्या संधी उपलब्ध होतात. या संसाधनांचा शाश्वत वापर करून आदिवासी समाजाचे जीवनमान उंचावण्यासाठी केंद्र शासनाच्या प्रधानमंत्री जनजातीय विकास मिशन, वनधन विकास केंद्रे, वनहक्क अधिनियम, २००६ आणि पेसा अधिनियम, १९९६ तसेच महाराष्ट्र शासनाच्या आदिवासी विकास योजनांना विशेष महत्त्व आहे. तथापि, या योजनांची परिणामकारकता निधीची उपलब्धता, प्रभावी अंमलबजावणी, वनउपजाचे मूल्यवर्धन, बाजारपेठेतील प्रवेश आणि स्थानिक समुदायाच्या सहभागावर अवलंबून आहे. या पार्श्वभूमीवर भारत, महाराष्ट्र आणि विदर्भातील वनाधारित आदिवासी अर्थव्यवस्थेचा आढावा घेऊन केंद्र व राज्य शासनाच्या योजनांचे योगदान, मर्यादा आणि विकासात्मक परिणाम यांचा चिकित्सक अभ्यास करणे, तसेच वनसंपत्तीचे शाश्वत संवर्धन आणि आदिवासी समाजाचा सर्वसमावेशक आर्थिक व सामाजिक विकास यांतील परस्परसंबंध स्पष्ट करणे, हि या संशोधनाची महत्वाची भूमिका आहे.

संशोधनाचा उद्देश:-

महाराष्ट्रातील आदिवासी समाज सामाजिकदृष्ट्या मागास असून आर्थिकदृष्ट्या जंगल व शेतीवर अवलंबून आहे. त्यांचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी केंद्र व राज्य सरकारने नैसर्गिक साधन संपत्तीचा विकास, रोजगार, वनहक्क, आणि वनउपज मूल्यवर्धन अशा विविध अंगांनी अनेक योजना राबवल्या आहेत. या योजनांमुळे आदिवासींच्या जीवनमानात

BODHIVRUKSHA JOURNAL OF DIVERSE DISCIPLINE (BJDD)
An Open-Access, Peer-Reviewed, Multidisciplinary Scholarly Journal | Bi-Monthly | Multilingual | Academic Research
Vol 2, Issue 6 (November-December 2026) (Special Issue 2) | ISSN: 3139-1486 (Online) | ISSN: 3139-9819 (Print)

सुधारणा घडवून आणण्याचा प्रयत्न दिसून येतो, मात्र त्यांचा वास्तविक परिणाम, अंमलबजावणीतील अडचणी व सुधारणा संधींचा अभ्यास करणे आवश्यक आहे.

उद्दिष्टे :-

१. आदिवासी समाजाच्या आर्थिक विकासासाठी केंद्र शासनाकडून राबविण्यात येणाऱ्या प्रमुख योजनांचा अभ्यास करणे.

२ . केंद्र व राज्य शासनाच्या आदिवासी विकास विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांचे विश्लेषण करणे.

३ . आदिवासी घटक कार्यक्रमांतर्गत करण्यात येणाऱ्या आर्थिक तरतुदींचा अभ्यास करणे.

४ . केंद्र व राज्य शासनाच्या योजनांमधील समन्वय आणि निधीच्या वापराचे चिकित्सक परीक्षण करणे.

५ . आदिवासी समाजाच्या उत्पन्नवाढीसाठी वनउपज, लघुउद्योग आणि कौशल्यविकास यांच्या संधींचा अभ्यास करणे.

६ . योजनांची परिणामकारकता वाढविण्यासाठी व आदिवासी विकासासाठी शिफारसी मांडणे व धोरणात्मक उपाययोजना सुचविणे.

संशोधनाची गृहीतकृत्ये:-

१. वनाधारित अर्थव्यवस्था आदिवासी समाजाच्या आर्थिक विकासास पूरक ठरते.

२. केंद्र व राज्य शासनाच्या योजनांमुळे आदिवासी समाजाचे आर्थिक स्वावलंबन वाढते.

३. वनहक्क आणि वनउपजाचे मूल्यवर्धन आदिवासींच्या उत्पन्नवाढीस उपयुक्त ठरते.

४. शासकीय योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीमुळे आदिवासी समाजाच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळते.

संशोधन पद्धती:-

सदर संशोधनामध्ये दुय्यम साधनांचा वापर केलेला असून त्यामध्ये लेख,पुस्तके मासिके यामधील विशेष माहितीचा उपयोग करण्यात आलेला आहे. तसेच संशोधनासाठी जनगणना, सरकारी अर्थसंकल्पीय दस्तऐवज, आदिवासी विकास विभागाचे अहवाल, केंद्र शासनाच्या योजनांची मार्गदर्शक तत्त्वे आणि उपलब्ध अधिकृत सांख्यिकीय माहिती यांचा दुय्यम स्रोत म्हणून उपयोग करण्यात आला आहे.

केंद्र शासनाच्या योजना:-

१. प्रधानमंत्री वन धन विकास योजना (PMVDVY)

भारताचे पंतप्रधान श्री नरेंद्र मोदी यांनी १४ एप्रिल २०१८ रोजी, वनक्षेत्रात राहणाऱ्या आदिवासींच्या उपजीविकेला चालना देण्यासाठी 'वनोपजांसाठी किमान आधारभूत किंमत' (MSP for MFP) योजनेचा एक घटक असलेली ' प्रधानमंत्री वन धन विकास योजना ' (PMVDVY) सुरू केली. केंद्रीय स्तरावर आदिवासी व्यवहार मंत्रालय हे नोडल विभाग आणि राष्ट्रीय स्तरावर ट्रायबल कोऑपरेटिव्ह मार्केटिंग डेव्हलपमेंट फेडरेशन ऑफ इंडिया (TRIFED) ही नोडल एजन्सी म्हणून काम पाहते , सरकारने ही योजना देशभरात राबवण्याचे आणि जंगलातील संपत्ती, म्हणजेच ' वन धन'चा उपयोग करून आदिवासींचे उत्पन्न वाढविण्यात मदत करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे .

BODHIVRUKSHA JOURNAL OF DIVERSE DISCIPLINE (BJDD)
An Open-Access, Peer-Reviewed, Multidisciplinary Scholarly Journal | Bi-Monthly | Multilingual | Academic Research
Vol 2, Issue 6 (November-December 2026) (Special Issue 2) | ISSN: 3139-1486 (Online) | ISSN: 3139-9819 (Print)

पंतप्रधान वन धन विकास योजना (PMVDVY) कार्यक्रमांतर्गत, वन धन विकास केंद्रे (VDVKs) स्थापन करून वनोपजांचे मूल्यवर्धन, ब्रँडिंग आणि व्यापारीकरण करून आदिवासींचे उत्पन्न सुधारण्याची सरकारची योजना आहे. ही केंद्रे आदिवासी उद्योजकतेला प्रोत्साहन आणि सुविधा देतील. हा कार्यक्रम आदिवासींना त्यांचे व्यवसाय वाढवण्यासाठी आणि उत्पन्न वाढवण्यासाठी आर्थिक भांडवल, प्रशिक्षण आणि मार्गदर्शनाच्या स्वरूपात सहाय्य देऊन सक्षम करेल. तसेच, हक्कांशिवाय जमीन/घराचा ताबा, वनोपज गोळा करण्यावरील निर्बंध, मध्यस्थांकडून होणारे शोषण, राष्ट्रीय उद्याने आणि वन्य अभयारण्यांमधून होणारे विस्थापन आणि वन्य गावांमध्ये विकासाचा अभाव यांसारख्या भारतीय आदिवासींना मोठ्या प्रमाणावर भेडसावणाऱ्या गंभीर समस्यांचे निराकरणही हा कार्यक्रम करतो वन धन विकास कार्यक्रम हा जंगलातील संपत्ती म्हणजेच वन धनाचा उपयोग करून आदिवासींसाठी उपजीविका निर्माण करण्याच्या उद्देशाने सुरू केलेला एक उपक्रम आहे. या कार्यक्रमाचा उद्देश आदिवासींच्या पारंपरिक ज्ञानाचा आणि कौशल्यांचा उपयोग करून, प्रत्येक टप्प्यावर तंत्रज्ञान आणि माहिती तंत्रज्ञानाची जोड देऊन ते अद्ययावत करणे आणि आदिवासी ज्ञानाचे एका व्यवहार्य आर्थिक उपक्रमात रूपांतर करणे हा आहे. या उपक्रमामुळे एका वर्षात सुमारे ४५ लाख आदिवासी वनोपज गोळा करणाऱ्यांना सुधारित उपजीविका मिळेल. आदिवासीबहुल जिल्ह्यांमध्ये आदिवासी समुदायाच्या मालकीची गौण वनोपज (MFP) केंद्रित बहुउद्देशीय वन धन विकास केंद्रे (केंद्र) स्थापन करण्याचा प्रस्ताव आहे. दोन वर्षांच्या कालावधीत सुमारे ६००० वन धन केंद्रे स्थापन करण्याचा प्रस्ताव आहे, म्हणजेच दरवर्षी ३००० केंद्रे स्थापन केली जातील, जी त्यांच्या कामगिरीच्या मूल्यांकनावर आधारित पुढे चालू ठेवली जातील आणि दरवर्षी त्यांचा विस्तारही केला जाईल असा मानस शासनाचा आहे.

२. प्रधानमंत्री आदिवासी उन्नत ग्राम अभियान:-

पीएम जेयुजीए संदर्भात १७ मंत्रालये सहयोग करत आहेत. ही मंत्रालये आदिवासी बहुल गावे आणि आकांक्षी जिल्ह्यांमध्ये महत्वाच्या योजनांची अंमलबजावणी करून सामाजिक पायाभूत सुविधा,आरोग्य,शिक्षण आणि उपजीविका या क्षेत्रांमधली गंभीर तफावत भरून काढत आहेत.ही योजना आदिवासी बहुल गावे (५०० किंवा अधिक लोकसंख्या किंवा किमान ५०% आदिवासी रहिवासी असलेली गावे) त्याचबरोबर ५० किंवा त्यापेक्षा जास्त आदिवासी लोकसंख्या असलेली आकांक्षी जिल्ह्यातील गावे यामध्ये राबविण्यात येते. ७९,१५६ कोटी रुपयांच्या या योजनेत केंद्रसरकारचे ५६,३३३ कोटी रुपये तर राज्य सरकारचे २२,८२३ कोटी रुपयांचे योगदान राहील. ५४९ जिल्ह्यांमधल्या दुर्गम भागातल्या ६३,००० आदिवासी बहुल गावांमध्ये विकास घडविणे हा या अभियानाचा उद्देश आहे. हे जिल्हे भारताच्या ७१ % जिल्ह्यांना सामावून घेतात. असे प्रधानमंत्री आदिवासी उन्नत ग्राम अभियान योजनेतून दिसून येते.

३. प्रधानमंत्री जनजाती आदिवासी न्याय महाअभियान (PM-JANMAN):-

सदर प्रधानमंत्री जनजाती आदिवासी न्याय महाअभियानाची सुरुवात आर्थिक वर्ष २०२३-२४ मध्ये विशेषतः असुरक्षित आदिवासी समूहांच्या (PVTGs) सामाजिक-आर्थिक विकासासाठी करण्यात आली.या अभियानाचा उद्देश पात्र आदिवासी कुटुंबे आणि वस्त्यांना मूलभूत सुविधा उपलब्ध करून देणे हा आहे. त्यामध्ये सुरक्षित निवास, पिण्याचे पाणी, शिक्षण, आरोग्य, पोषण, रस्ते, दूरसंचार, वीज आणि शाश्वत उपजीविका यांचा समावेश होतो.या अभियानांतर्गत ११ हस्तक्षेपांद्वारे नऊ संबंधित मंत्रालयांच्या माध्यमातून विविध सुविधा उपलब्ध करून देण्याची रचना करण्यात आली आहे.या योजनेचे महत्त्व म्हणजे अत्यंत दुर्गम भागांतील आणि विशेषतः असुरक्षित आदिवासी समुदायांच्या मूलभूत गरजांना प्राधान्य देणे. तथापि, घरकुल, पाणी किंवा रस्ता उपलब्ध झाल्यानंतरही शाश्वत उत्पन्ननिर्मिती आपोआप होत नाही.त्यासाठी स्थानिक रोजगार, कृषी व वनाधारित उपजीविका, आरोग्यसेवा, शिक्षण आणि बाजारपेठ यांच्याशी योजनांची सांगड घालणे आवश्यक आहे.योजनेच्या यशाचे मूल्यमापन करताना मंजूर कामांची संख्या न पाहता प्रत्यक्ष पूर्ण झालेली कामे, वापरात असलेल्या सुविधा, लाभार्थी कुटुंबांची संख्या आणि त्यांच्या जीवनमानातील बदल तपासणे आवश्यक आहे.

BODHIVRUKSHA JOURNAL OF DIVERSE DISCIPLINE (BJDD)
An Open-Access, Peer-Reviewed, Multidisciplinary Scholarly Journal | Bi-Monthly | Multilingual | Academic Research
Vol 2, Issue 6 (November-December 2026) (Special Issue 2) | ISSN: 3139-1486 (Online) | ISSN: 3139-9819 (Print)

तक्ता क्र. १ केंद्र सरकार आदिवासी विभाग सन २०२४-२५ मधील योजनानिहाय निधी वाटप व मंजूर निधीची आकडेवारी

अ. क्र.	योजनेचे नाव	योजनेचा प्रमुख उद्देश	योजनेचा निधी वाटप (कोटी रु)	मंजूर निधी (कोटी रु)
१	प्रधानमंत्री जनजातीय विकास मिशन (PMJVM)	वन उपज संकलन, प्रकिया,मुल्यवर्धन व विपणन	१५२.३२ कोटी रु.	११२.२८० कोटी रु.
२	प्रधानमंत्री जनजाती आदिवासी न्याय महाअभियान (PM-JANMAN)	विशेषत: असुरक्षित आदिवासी समूहांचा विकास	२६५.०० कोटी रु.	१००.८०१ कोटी रु.
३	धरती आबा जनजातीय ग्राम योजना	आदिवासीबहुल गावातील पायाभूत सुविधा व उपजीविका	०.००	४७७.६८० कोटी रु.
४	प्रधानमंत्री आदर्श ग्राम योजना (PMAAGY)	आदिवासीबहुल गावांचा एकात्मिक विकास	१,०००.०० कोटी रु.	१२६.१९० कोटी रु.
५	विशेषत: असुरक्षित आदिवासी समूहांचा विकास(PVTG)	अतिसंवेदनशील आदिवासी समूहांच्या विकासासाठी सहाय्य	२०.०० कोटी रु.	७३.०९० कोटी रु.
६	संविधानाच्या अनूच्छेद २७५ (१) अंतर्गत	आदिवासी क्षेत्रातील विकासकामसाठी आर्थिक सहाय्य	१,५४१.४७ कोटी रु.	१,१७०.५७० कोटी रु.
७	अनुसूचित जमाती कल्याणकारी स्वयंसेवी संस्थाना सहाय्य	आदिवासी विकास कार्यक्रमांना सहाय्य	१६०.०० कोटी रु.	१७५.३१४ कोटी रु.

BODHIVRUKSHA JOURNAL OF DIVERSE DISCIPLINE (BJDD)
An Open-Access, Peer-Reviewed, Multidisciplinary Scholarly Journal | Bi-Monthly | Multilingual | Academic Research
Vol 2, Issue 6 (November-December 2026) (Special Issue 2) | ISSN: 3139-1486 (Online) | ISSN: 3139-9819 (Print)

८	अनुसूचित जमातींसाठी उद्यम भांडवल निधी	आदिवासी उद्योगजकतेला आर्थिक सहाय्य	३० ०० कोटी रु.	०.००
	एकूण		३,१६८.७९.कोटी रु.	२,२३६.२२५.कोटी

(स्रोतः भारत सरकार, आदिवासी कार्य मंत्रालय, Scheme-wise Sanction Order & Financial Summary, 2024-25)

वरील तक्त्यामध्ये सन २०२४-२५ या कालावधीमध्ये केंद्र सरकारच्या आदिवासी विभागा अंतर्गत येणाऱ्या आदिवासी समुदायाच्या योजना निहाय निधींची तरतूद दिलेली आहे. वरीलपैकी बहुतांश निधी हा प्रधानमंत्री जनजातीय विकास मिशन, प्रधानमंत्री जनजाती आदिवासी न्याय महाअभियान, धरती आबा ग्राम योजना, प्रधानमंत्री

आदर्श ग्राम योजना, सोबतच पिव्हि.टीजी, आदिवासी क्षेत्राच्या विकासासाठी आर्थिक सहाय्य योजना, कल्याणकारी संस्थांना सहाय्य व अनुसूचित जमाती जमातींसाठी उद्यम भांडवल निधी अशा प्रकारच्या योजनांसाठी सरकारने तरतूद केली असून त्यामध्ये एकंदरीत या सर्व योजनांचा जर विचार केला तर असे निदर्शनास येते की या संपूर्ण योजनेचा एकूण निधी हा अर्थसंकल्पीय तरतूद निधी वाटप ३,१६८.७९. कोटी. रु. असून त्यामध्ये २,२३६.२२५ कोटी रुपये, एवढा योजनेचा निधी मंजूर करण्यात आलेला आहे.

राज्य शासनाच्या योजना:-

महाराष्ट्र शासनाच्या अंतर्गत येणाऱ्या सर्व योजनांसाठी आदिवासी विकास विभागास सन २०२५-२६ या आर्थिक वर्षाकरिता अनिवार्य खर्च अंतर्गत रु.३३५.०६९५ कोटी रु.तरतुद अर्थसंकल्पित करण्यात आली आहे.राज्याचे वार्षिक कार्यक्रम सन २०२५-२९ चे आकारमान एकूण रू.२५४५६०,०० कोटी रु.इतके आहे. त्यापैकी कार्यक्रम खर्चाकरीता आदिवासी घटक कार्यक्रमास सन २०२५-२६ करीता नियोजन विभागाने रु.२१४९५.०० कोटी नियतव्यय उपलब्ध करुन दिलेला आहे. सदर नियतव्ययाचे एकूण राज्य आकारमानाशी प्रमाण ८.४४% इतके आहे. यामध्ये मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण या योजनेकरीता रु.३२४०.०० कोटी रु, मुख्यमंत्री बळीराजा वीज सवलत योजनेकरीता रु.१०८०.०० कोटी रु,व घरकूल योजनेकरीता रु.१८१५ .०० कोटी इतका नियतव्यय समाविष्ट करण्यात आला आहे.प्राप्त झालेल्या नियतव्ययाचे वाटप करण्यासाठी मा.मंत्री (आदिवासी विकास) यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या राज्यस्तरीय बैठकीतील निर्णयांनुसार जिल्हा वार्षिक आदिवासी घटक कार्यक्रमासाठी रु.२७३४.६९२७ कोटी रु, तरतूद अर्थसंकल्पित करण्यात आली असून राज्यस्तरीय आदिवासी घटक कार्यक्रमासाठी रु.१८७६०.३०७३ कोटी रु, इतकी तरतूद अर्थसंकल्पित करण्यात आली आहे.

तसेच आदिवासी घटक कार्यक्रमांतर्गत केंद्र पुरस्कृत/केंद्र सहाय्यित योजनांच्या केंद्र हिश्श्याकरीता (shadow provision) रु.६०३१.२४७६ कोटी रु, एवढी तरतूद अर्थसंकल्पित करण्यात आलेली असून यामध्ये आदिवासी विकास विभागाच्या योजनांकरीता रु.१३९०.०००३कोटी रु, तर इतर प्रशासकीय विभागांच्या योजनांकरीता रु.४६४१,.२४७३ कोटी रुपये इतकी तरतूद करण्यात आली आहे.उपरोक्तप्रमाणे आदिवासी घटक कार्यक्रमांतर्गत सन २०२४-२५ या आर्थिक वर्षाकरिता कार्यक्रम खर्चाकरीता सद्यस्थितीत एकूण रू.२७५२६.२४७६ कोटी रु,तरतुद अर्थसंकल्पित करण्यात आलेली आहे.आदिवासी विकास विभागाच्या योजनांकरीता राज्यस्तरावरुन रु.९३१०.४०५० कोटी व जिल्हा स्तरावरुन रु.६०७.२० कोटी रु, अशी एकूण रु.९९१७.६०५ कोटी रुपये तरतूद अर्थसंकल्पित करण्यात आली आहे.

BODHIVRUKSHA JOURNAL OF DIVERSE DISCIPLINE (BJDD)
An Open-Access, Peer-Reviewed, Multidisciplinary Scholarly Journal | Bi-Monthly | Multilingual | Academic Research
Vol 2, Issue 6 (November-December 2026) (Special Issue 2) | ISSN: 3139-1486 (Online) | ISSN: 3139-9819 (Print)

१.पेसा कायदा, १९९६:-

या कायद्यांर्गात अनुसूचित क्षेत्रांतील ग्रामसभांना आणि स्थानिक स्वशासन संस्थांना सक्षम करण्याच्या दृष्टीने पंचायत (अनुसूचित क्षेत्रांमध्ये विस्तार) अधिनियम, १९९६ अर्थात पेसा कायदा महत्त्वपूर्ण आहे.हा कायदा अनुसूचित क्षेत्रांमध्ये स्थानिक स्वशासनाच्या प्रक्रियेला आदिवासी समाजाच्या परंपरा, प्रथा आणि सामुदायिक संसाधन व्यवस्थापनाशी जोडण्याचा प्रयत्न करतो. ग्रामसभेचा सहभाग वाढल्यास स्थानिक गरजांनुसार विकास आराखडे तयार करणे, लाभार्थ्यांची निवड पारदर्शक करणे आणि योजनांवर सामाजिक देखरेख ठेवणे शक्य होते.मात्र, ग्रामसभेचे अधिकार, उपलब्ध माहिती, तांत्रिक क्षमता आणि आर्थिक साधने प्रभावी असणे आवश्यक आहे. केवळ औपचारिक बैठकांमुळे स्थानिक स्वशासनाचे उद्दिष्ट साध्य होत नाही.

पेसा ५ टक्के अबंध निधी योजना

सन २०१५-१६ या वर्षापासून राज्यातील अनुसूचित क्षेत्रातील ग्रामपंचायतींना आदिवासी उपाययोजना अंतर्गत ५% अबंध निधी योजना सुरु करण्यात आली आहे. सदर योजनेकरिता शासनाने सं २०२५-२६ या आर्थिक वर्षाकरिता रु. २६७.८८ कोटी इतकी करण्यात आलेली आहे.

२. स्वयंरोजगार आणि उत्पन्नवाढीच्या योजना:-

महाराष्ट्र शासनाच्या आदिवासी विकास विभागामार्फत आदिवासी लाभार्थ्यांसाठी आर्थिक उत्पन्नवाढीच्या विविध योजना राबविण्यात येतात.या योजनांमध्ये स्थानिक परिस्थितीनुसार कृषीविषयक साधने, सिंचनासाठी मदत, स्वयंरोजगार, लघुउद्योग आणि इतर उत्पन्ननिर्मितीच्या उपक्रमांचा समावेश होऊ शकतो स्वयंरोजगार योजनांमुळे आदिवासी कुटुंबांना स्वतंत्र उत्पन्नाचे स्रोत निर्माण करण्याची संधी मिळू शकते.मात्र, आर्थिक मदत किंवा साधनांचे वितरण हे उद्यम यशस्वी होण्याची हमी देत नाही. बाजारपेठ, कच्चा माल, तांत्रिक मार्गदर्शन, कार्यभांडवल, प्रशिक्षण आणि विक्रीव्यवस्था यांचा समन्वय आवश्यक आहे.त्यामुळे स्वयंरोजगार योजनांचे मूल्यमापन करताना स्थापन झालेल्या उपक्रमांची संख्या, त्यांचे अस्तित्व, वार्षिक उलाढाल, निव्वळ उत्पन्न आणि रोजगारनिर्मिती यांचा अभ्यास करणे आवश्यक आहे.

३. वनहक्क कायदा, २००६ (योजना):-

अनुसूचित जमाती आणि इतर पारंपरिक वननिवासी (वनहक्कांची मान्यता) अधिनियम, २००६ हा वनाधारित उपजीविका आणि आदिवासी हक्कांच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण कायदा आहे. या कायद्यात पात्र वननिवासी समुदायांच्या वैयक्तिक आणि सामुदायिक वनहक्कांना मान्यता देण्याची तरतूद आहे. निवासाशी संबंधित हक्क, काही सामुदायिक वापराचे हक्क तसेच पात्रतेनुसार सामुदायिक वनसंसाधनांचे संरक्षण, संवर्धन आणि व्यवस्थापन करण्याच्या हक्कांचा समावेश होतो. वनहक्कांची मान्यता आदिवासी कुटुंबांना संसाधनांवरील कायदेशीर अधिकार आणि उपजीविकेच्या संधी उपलब्ध करून देण्यास मदत करू शकते.मात्र, हक्कपत्र मिळणे आणि त्याचा शाश्वत आर्थिक लाभ मिळणे या स्वतंत्र बाबी आहेत. जमीन किंवा वनसंसाधनांचा उत्पादक वापर, तांत्रिक मार्गदर्शन, स्थानिक संस्थांचे सक्षमीकरण, वनउपज प्रक्रिया आणि बाजारपेठेतील प्रवेश यांचा समन्वय आवश्यक आहे. हक्कांची मान्यता देताना कायदेशीर पात्रता, पर्यावरणीय शाश्वतता आणि संबंधित कायद्यांतील तरतुदींचे पालन करणेही आवश्यक आहे.

२००६ मध्ये अनुसूचित जमाती आणि इतर पारंपरिक वनिवासी (वन हक्काची मान्यता) कायदा (फारेस्ट राईट्स ॲक्ट) संमत केला. या समूहानुसार बांबू, मोह, लाख, तेंदू,मेण,खोडे,मध, चंदन, शिकेकाई,कंद आणि वनौषधी घटक अशा वन उत्पादित वस्तूंचे विनियमन केले जाते.सरकार पीएमजेव्हीएम अंतर्गत ८७ गौण वनउपजाला आधारभूत किमत परिणाम

BODHIVRUKSHA JOURNAL OF DIVERSE DISCIPLINE (BJDD)
An Open-Access, Peer-Reviewed, Multidisciplinary Scholarly Journal | Bi-Monthly | Multilingual | Academic Research
Vol 2, Issue 6 (November-December 2026) (Special Issue 2) | ISSN: 3139-1486 (Online) | ISSN: 3139-9819 (Print)

करते.वन हक्क कायदा वननिवासी समुदायाची उपजीवीकिय ऐतिहासिक भूमिका वनउत्पादनावर आधारित असल्याचे सांगते. आदिवासींना लाकूड इतर गौण वनोपज दाखवून त्याची विक्री करण्याचा अधिकार देण्यात आला आहे. या अतिरिक्त, पंचायत (अनुसूचित क्षेत्राचा विस्तार) कायदा,१९९६) (पीईएसए पेसा) अंतर्गत आदिवासी ग्रामपंचायतींना गौण वनोपज लाभार्थी हक्क प्रदान करण्यात आले आहेत,आदिवासी उत्पादन मार्केटिंग (मार्केटिंग) आणि विकासाची धुरा असलेल्या ट्रायबलपरेटिव्ह मार्केटिंग डेव्हलपमेंट फेडरेशन इंडिया(ट्रायफेड-टीआर आय एफ ई डी) या भारतीय आदिवासी सहकारी मार्केटिंगचा विकास महासंघामार्फत बाजारातील किमतीचा विचार न करता पूर्व-निर्धारित दराने (एमएसपी) वनोपजांची खरेदी केली जाते. हे काम राज्य विकास संस्था जसे आदिवासी सहकारी संस्था आणि वन विकास महामंडळे याद्वारे केले जाते. २०१३-१४ पासून, राज्य सरकारांनी या अंतर्गत ६९३.९८ कोटी रुपये मूल्याचे २,६७,९५४ मेट्रिक टन गौण वन उपज खरेदी केले आहे.

४. व्युक्लिअस बजेट:-

ज्या योजना आदिवासी विकास किवा कल्याणाच्या दृष्टीने सालानुरूप आवश्यक आहेत आणि त्या योजनांचा समावेश अर्थसंकल्पात नाही. अशा अभिनव स्वरूपाच्या स्थानिक महत्वाच्या योजनाकाही तांत्रिक औपचारिकतेमुळे दीर्घ कालावधीसाठी अडकून न पडता स्थानिक पातळीवर तातडीने व प्रभावीपणे कार्यान्वित करुन त्यांचा लाभ गरजू आदिवासीच प्रत्यक्ष मिळवून देणे हा योजनेचा गाभा आहे. न्युक्लीअस बजेट योजनेत प्रत्येक आदिवासी व्यक्तीसवअथवा कुटुंबास लाभाची आर्थिक मर्यादा ५०,०००/- आहे. योजनेतर्गत २ किंवा ३ किंवा त्यापेक्षा अधिक आदिवासी लाभार्थी एकत्र आले तर सामुहिक प्रकल्प कार्यक्रम सुद्धा मंजूर करता येतात व अशा प्रकल्पात एकुण कमाल मर्यादा रु. ७,५०,००० आहेत २०२५-२६साठी सदर योजनेकरिता एकूण रु.५०,०० कोटी तरतूद करण्यात आली आहे अशा प्रकारे न्युक्लीअस बजेट योजना आदिवासी कुटुंबास प्रोत्साहित ठरते.

५. राणी दुर्गावती आदिवासी महिला सक्षमीकरण योजना:-

महाराष्ट्र शासनाच्या आदिवासी विकास विभागाने २० ऑगस्ट २०२५ रोजीच्या शासन निर्णयाद्वारे राणी दुर्गावती आदिवासी महिला सक्षमीकरण योजना राबविण्यास मान्यता दिली. या योजनेचा उद्देश आदिवासी महिलांना शिक्षण, आरोग्य, प्रशासन, समाजकारण आणि अर्थकारण अशा विविध क्षेत्रांमध्ये सक्षम बनविणे हा आहे. या पार्श्वभूमीवर महिला बचतगट, वनधन विकास केंद्रे, कौशल्यविकास, शासकीय अर्थसहाय्य, सवलतीचे कर्ज आणि वनउपजाच्या मूल्यवर्धनावर आधारित उद्योग हे आदिवासी महिलांच्या आर्थिक स्वावलंबनासाठी महत्त्वाचे घटक ठरतात. महिलांना केवळ योजनांच्या लाभार्थी म्हणून न पाहता, स्थानिक अर्थव्यवस्थेच्या उत्पादक, उद्योजक आणि निर्णयप्रक्रियेतील सक्रिय घटक म्हणून विकसित करणे आवश्यक आहे

६. आदिवासी उपयोजना (TSP):-

आदिवासी उपयोजना (Tribal Sub-Plan - TSP) ही अनुसूचित जमातींच्या सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक विकासासाठी शासनाच्या विविध विभागांच्या योजनांमधून निधीचे नियोजन करण्याची महत्त्वपूर्ण व्यवस्था आहे.या उपयोजनेची सुरुवात १९७४-७५ या कालखंडात झाली. महाराष्ट्रात १९७५-७६ पासून आदिवासी उपयोजनेच्या माध्यमातून आदिवासीबहुल क्षेत्रांच्या विकासासाठी नियोजन करण्यात आले.

या व्यवस्थेचा मुख्य उद्देश आदिवासी समाज आणि इतर समाजघटकांमधील विकासविषयक तफावत कमी करणे, रोजगारनिर्मिती करणे, शिक्षण व आरोग्य सुविधा वाढविणे आणि आदिवासींच्या उत्पन्नात वाढ घडवून आणणे हा आहे

BODHIVRUKSHA JOURNAL OF DIVERSE DISCIPLINE (BJDD)
An Open-Access, Peer-Reviewed, Multidisciplinary Scholarly Journal | Bi-Monthly | Multilingual | Academic Research
Vol 2, Issue 6 (November-December 2026) (Special Issue 2) | ISSN: 3139-1486 (Online) | ISSN: 3139-9819 (Print)

आदिवासी उपयोजना ही भारतातील अनुसूचित जमातींच्या सामाजिक व आर्थिक विकासासाठी महत्त्वपूर्ण आर्थिक नियोजन व्यवस्था आहे. केंद्र शासनाच्या विविध मंत्रालयांद्वारे आणि महाराष्ट्र शासनाच्या आदिवासी घटक कार्यक्रमाच्या माध्यमातून शिक्षण, आरोग्य, निवास, पायाभूत सुविधा, रोजगार आणि कौशल्य विकासासाठी निधीची तरतूद केली जाते.महाराष्ट्र शासनाच्या अधिकृत आकडेवारीनुसार, २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठी आदिवासी घटक कार्यक्रमाकरिता ₹२१,४९५ कोटींचा नियतव्यय उपलब्ध करून देण्यात आला. त्यापैकी ₹२,७३४.६९ कोटी जिल्हास्तरीय आणि ₹१८,७६०.३१ कोटी राज्यस्तरीय कार्यक्रमांसाठी तरतूद करण्यात आली आहे. ही आकडेवारी आदिवासी विकासासाठी राज्यस्तरीय नियोजनाचे आर्थिक महत्त्व विशद करते.

योजनांचा आदिवासी समाजाच्या आर्थिक स्थितीवरील परिणाम

रोजगारनिर्मिती आणि उत्पन्नवाढ:-

आदिवासी समाजाच्या आर्थिक परिस्थितीचा विचार केला तर वनउपज संकलन हे आदिवासी समाजातील अनेक कुटुंबांसाठी पारंपरिक रोजगाराचे साधन आहे. केंद्र व राज्य शासनाच्या वनउपज खरेदी, रोजगार हमी, वनधन विकास केंद्रे आणि कौशल्यविकास व वन व्यवस्थापन समिती अशा कार्यक्रमांमुळे या पारंपरिक उपजीविकेला अधिक संघटित व मूल्यवर्धित स्वरूप देण्याची संधी उपलब्ध होते. गौण वनउपजासाठी किमान आधारभूत किंमत निश्चित करणे आणि शासकीय खरेदी यंत्रणा सक्षम करणे यामुळे उत्पादकांना बाजारातील अनिश्चिततेपासून काही प्रमाणात संरक्षण मिळू शकते. वनधन विकास केंद्रांच्या माध्यमातून वनउपजाचे वर्गीकरण, स्वच्छता, प्रक्रिया, पॅकेजिंग आणि विपणन केल्यास कच्च्या मालाच्या विक्रीपेक्षा अधिक उत्पन्न मिळविण्याची शक्यता निर्माण होते. मात्र, या योजनांचा प्रत्यक्ष आर्थिक परिणाम सर्व भागांमध्ये समान नाही. वनउपजाची उपलब्धता, खरेदी केंद्रांचे स्थान, वाहतूक खर्च, बाजारपेठेपर्यंत पोहोच, स्थानिक संस्थांची कार्यक्षमता आणि लाभार्थ्यांना मिळणारी माहिती या घटकांनुसार परिणामांमध्ये फरक पडतो. त्यामुळे रोजगारनिर्मितीच्या योजनांचे यश मोजताना निर्माण झालेल्या रोजगारदिवसांबरोबरच प्रतिकुटुंब निव्वळ उत्पन्नातील बदल दिसून येतो. .

मूल्यवर्धन आणि स्थानिक अर्थव्यवस्थेचा विकास:-

आदिवासी समाजाला वनउपजापासून अपेक्षित आर्थिक लाभ मिळण्यात एक महत्त्वाची अडचण म्हणजे कच्च्या मालाच्या स्वरूपात विक्री करावी लागणे. उदाहरणार्थ, मोहफुले, चंदन, शिकेकाई,मध, बांबू, तेंदूपत्ता, डिंक आणि औषधी वनस्पती यांवर स्थानिक पातळीवर प्रक्रिया करण्यासाठी आवश्यक साधने, प्रशिक्षण, भांडवल आणि बाजारपेठ उपलब्ध नसल्यास उत्पादकांना अंतिम विक्री मूल्यातील मर्यादित हिस्सा मिळतो.वनधन विकास केंद्रे, आदिवासी सहकारी संस्था, स्वयं-सहायता गट आणि ग्रामसभांच्या माध्यमातून स्थानिक प्रक्रिया उद्योग विकसित केल्यास रोजगारनिर्मितीला चालना मिळू शकते. बांबूपासून हस्तकला व उपयुक्त वस्तू, मोहफुलांपासून नियमानुसार मूल्यवर्धित उत्पादने, मधाचे शुद्धीकरण व पॅकेजिंग, तसेच औषधी वनस्पतींचे योग्य वर्गीकरण आणि प्रक्रिया यांमधून स्थानिक अर्थव्यवस्थेला बळकटी मिळू शकते.

यामुळे केवळ कुटुंबांचे उत्पन्न वाढण्याची शक्यता निर्माण होत नाही, तर ग्रामीण भागात सूक्ष्म उद्योग, वाहतूक, साठवणूक, पॅकेजिंग आणि विपणनाशी संबंधित पूरक रोजगारही निर्माण होऊ शकतो. तथापि, अशा उद्योगांची आर्थिक व्यवहार्यता, उत्पादनाची गुणवत्ता, आवश्यक परवाने, पर्यावरणीय नियम आणि बाजारपेठेतील मागणी यांचा विचार करणे आवश्यक आहे.या मधूनच मूल्यवर्धन आणि स्थानिक अर्थव्यवस्थेचा विकास हा साध्य होऊ शकतो.

BODHIVRUKSHA JOURNAL OF DIVERSE DISCIPLINE (BJDD)
An Open-Access, Peer-Reviewed, Multidisciplinary Scholarly Journal | Bi-Monthly | Multilingual | Academic Research
Vol 2, Issue 6 (November-December 2026) (Special Issue 2) | ISSN: 3139-1486 (Online) | ISSN: 3139-9819 (Print)

महिला सक्षमीकरण आणि आर्थिक स्वावलंबन:-

महिला सक्षमीकरण आणि आर्थिक स्वावलंबन या घटकाचा जर विचार केला तर वनउपज संकलन, प्रक्रिया आणि विक्रीमध्ये आदिवासी महिलांचे महत्त्वपूर्ण योगदान असते. स्वयं-सहायता गट, वनधन विकास केंद्रे आणि स्थानिक प्रक्रिया उद्योगांमध्ये महिलांचा सहभाग वाढल्यास त्यांच्या उत्पन्ननिर्मितीच्या संधी विस्तारू शकतात. तसेच महिलांच्या नेतृत्वाखाली मध प्रक्रिया, वनउपजाचे वर्गीकरण, बांबू हस्तकला, स्थानिक उत्पादनांचे पॅकेजिंग आणि विक्री यांसारखे उपक्रम राबविल्यास आर्थिक स्वावलंबनाला चालना मिळू शकते. त्याचबरोबर कुटुंबातील आर्थिक निर्णयप्रक्रियेत महिलांचा सहभाग आणि सामुदायिक संस्थांमधील प्रतिनिधित्व वाढण्यास मदत होऊ शकते.

तथापि, महिलांच्या सहभागाचे मूल्यमापन करताना त्यांच्याकडे प्रत्यक्ष राहणारे उत्पन्न, कामाचे तास, मोबदल्यातील समानता, बाजारपेठेतील स्वायत्तता आणि नेतृत्वाच्या संधी यांचा विचार करणे आवश्यक आहे. त्यामुळे आर्थिक स्वावलंबनातून महिला सक्षमीकरण हे ध्येय साध्य होताना दिसून येते.

वनहक्क आणि नैसर्गिक साधनसंपत्तीवरील आर्थिक अधिकार:-

वनहक्क अधिनियम, २००६ हा वनांवर उपजीविकेसाठी अवलंबून असलेल्या अनुसूचित जमाती आणि पात्र इतर पारंपरिक वननिवासींच्या वैयक्तिक व सामुदायिक वनहक्कांच्या मान्यतेसाठी महत्त्वाचा कायदा आहे. सामुदायिक वनसंसाधनांवरील हक्कांची मान्यता आणि त्यांचे प्रभावी व्यवस्थापन यांमुळे पात्र ग्रामसभांना वनसंपत्तीच्या संरक्षणात, व्यवस्थापनात आणि कायद्यानुसार वनउपजाच्या वापरात अधिक महत्त्वाची भूमिका बजावता येते.

या हक्कांचा आर्थिक परिणाम वनउपज संकलनावरील प्रवेश, स्थानिक निर्णयप्रक्रियेतील सहभाग आणि उपलब्ध संसाधनांचे सामूहिक व्यवस्थापन या माध्यमांतून दिसून येऊ शकतो. मात्र, केवळ हक्कपत्र मिळणे म्हणजे आर्थिक विकास साध्य होणे नव्हे. वनउपजाची शाश्वत उपलब्धता, बाजारपेठेतील प्रवेश, तांत्रिक मार्गदर्शन, संस्थात्मक क्षमता आणि विक्रीतून मिळणाऱ्या उत्पन्नाचे पारदर्शक व्यवस्थापन या बाबीही तितक्याच महत्त्वाच्या आहेत. त्यामुळे वनहक्क कायद्याच्या अंमलबजावणीचे मूल्यमापन करताना वितरित वैयक्तिक हक्कपत्रांबरोबरच सामुदायिक वनसंसाधन हक्कांची स्थिती, ग्रामसभांचे अधिकार, वनउपज विक्रीतून मिळालेले उत्पन्न आणि ग्रामविकासासाठी वापरलेला निधी यांचा विचार करणे आवश्यक आहे.

अशाप्रकारे योजनांचा अपेक्षित आर्थिक परिणाम साधण्यासाठी निधीचा प्रभावी वापर सोबतच सर्व योजनांची पारदर्शक अंमलबजावणी आणि आदिवासी समुदायापर्यंत योजनांचा प्रत्यक्ष लाभ पोहचणे आवश्यक आहे.त्यामुळे वन संपत्तीचे संवर्धन आणि आदिवासी समाजाचे आर्थिक सक्षमीकरण व वन आधारित अर्थव्यवस्थेचा समन्वय साधने हे या समाजाच्या सर्वसमावेशक विकासासाठी महत्वपूर्ण ठरेल.

शिफारसी व उपाययोजना:-

१. वनउपजाचे मूल्यवर्धन बांबू, तेंदूपत्ता, मध व गौण वनउपजांवर आधारित लघुउद्योगांना प्रोत्साहन द्यावे.
२ . रोजगारनिर्मितीवनसंपत्तीवर आधारित स्थानिक उद्योग व स्वयंरोजगाराच्या संधी वाढवाव्यात.
२ . महिला सक्षमीकरण आदिवासी महिला बचतगटांना वनउपज प्रक्रिया व विक्रीसाठी प्रोत्साहन द्यावे.
३ . शाश्वत वनव्यवस्थापन वनसंवर्धन आणि नैसर्गिक साधनसंपत्तीचा शाश्वत वापर यांचा समन्वय साधावा.
४ . ग्रामसभांचा सहभाग वनसंपत्ती व्यवस्थापन व विकास योजनांच्या नियोजनात ग्रामसभांचा सहभाग वाढवावा.
५ . सर्वांगीण विकास म्हणजेच आर्थिक विकासासोबत शिक्षण, आरोग्य, कौशल्य विकास आणि मूलभूत सुविधांचा सुद्धा विचार करावा,

BODHIVRUKSHA JOURNAL OF DIVERSE DISCIPLINE (BJDD)
An Open-Access, Peer-Reviewed, Multidisciplinary Scholarly Journal | Bi-Monthly | Multilingual | Academic Research
Vol 2, Issue 6 (November-December 2026) (Special Issue 2) | ISSN: 3139-1486 (Online) | ISSN: 3139-9819 (Print)

६. वनउपज संकलन, प्रक्रिया, साठवणूक आणि विक्रीसाठी प्रशिक्षण व आर्थिक सहाय्य द्यावे.
७. वन व्यवस्थापन समित्यांचे बळकटीकरण करून स्थानिक आदिवासींचा वन व्यवस्थापन आणि उत्पन्नवाटपातील सहभाग वाढवावा
८. शासकीय निधीचा योग्य वापर व पारदर्शकता आणि योजनांचा आर्थिक व सामाजिक परिणाम नियमितपणे तपासून योजनेचे मूल्यमापन करावे.

निष्कर्ष:-

वनउपज आधारित अर्थव्यवस्था ही आदिवासी समाजाच्या आर्थिक व सामाजिक विकासासाठी महत्त्वपूर्ण आधार ठरू शकते. केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजना, वनहक्क कायदा, पेसा कायदा, रोजगारनिर्मितीचे उपक्रम आणि वनउपजाच्या मूल्यवर्धनासाठी उपलब्ध असलेली संस्थात्मक व्यवस्था यांमुळे आदिवासी समाजाच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी संधी निर्माण झाल्या आहेत. परंतु योजनांचे यश केवळ निधीची तरतूद किंवा लाभार्थ्यांच्या संख्येवर अवलंबून नसून, त्यांची पारदर्शकता प्रभावी अंमलबजावणी, स्थानिक समुदायाचा सहभाग, बाजारपेठेतील प्रवेश, वनउपजाला मिळणारा योग्य मोबदला आणि नैसर्गिक साधनसंपत्तीचे शाश्वत व्यवस्थापन यांवर अवलंबून आहे. आदिवासीबहुल क्षेत्रांमध्ये वनउपज संकलनापासून प्रक्रिया, मूल्यवर्धन आणि अंतिम विक्रीपर्यंतची संपूर्ण आर्थिक साखळी स्थानिक समुदायाच्या सहभागातून विकसित करणे आवश्यक आहे. यामुळे रोजगाराच्या संधी वाढू शकतात, उत्पन्नातील अनिश्चितता कमी होऊ शकते आणि स्थानिक अर्थव्यवस्थेला बळकटी मिळू शकते.

अंतिमतः आदिवासी समाजाचा सर्वांगीण सर्वसमावेशक विकास साधण्यासाठी वनसंपत्तीचे केवळ संकलन व विक्री करण्याऐवजी तिचे शाश्वत व्यवस्थापन, स्थानिक मूल्यवर्धन, आर्थिक लाभांचे न्याय्य वितरण आणि सामाजिक सेवांचा विस्तार यांचा एकात्मिक दृष्टिकोन स्वीकारणे आवश्यक आहे. अशा दृष्टिकोनातून केंद्र व राज्य शासनाच्या योजनांचे परिणामाधारित मूल्यमापन केल्यास आदिवासी समाजाच्या आर्थिक स्वावलंबनासाठी आणि सामाजिक न्यायाच्या उद्दिष्टपूर्तीसाठी अधिक प्रभावी धोरणे विकसित करता येतील.

संदर्भग्रंथ सूची (References):-

१. वन हक्क कायदा - Forest Rights Act - 2006)
२. अमोल लक्ष्मण घोडके : भारतातील मानव संसाधन विकास, भाग १, खंड १, पब्लिकेशन द युनिक अकॅडमी पुणे (एप्रिल-२०१३) पृष्ठ क्र.३.
३. भारत व स्थिती रिपोर्ट, -२०२३,खंड १, भारतीय वन संरक्षण विभाग भारत सरकार, संस्करण १८, खंड एक (२०२३)
४. दीपक बाविस्कर,दिलीप पाटील : महाराष्ट्राचा भूगोल; दीपस्तंभ प्रकाशन जळगाव (जून - २०२५)
५. भारत सरकार, आदिवासी कार्य मंत्रालय; ५ फेब्रुवारी २०२६; 'इंडिया स्टेट ऑफ फॉरेस्ट रिपोर्ट २०२३' (भारतातील वनस्थिती अहवाल २०२३)
६. महाराष्ट्र शासन, महाराष्ट्र आर्थिक पाहणी २०२२-२३, प्रधान मुख्य वनसंरक्षक कार्यालय, महाराष्ट्र राज्य
७. दत्ता, एस. आणि रॉय, एस. (२०१७) भारतातील आदिवासी विकासातील सामाजिक-आर्थिक अडथळ्यांचे विश्लेषण. इंडियन इकॉनॉमिक रिव्ह्यू ४(५). पृ. ५६-६९.
८. सिंग, आर. (२०१८) वन धन योजनेद्वारे आदिवासी आर्थिक विकास. आदिवासी आर्थिक विकास पुनरावलोकन २ (१). पृ. ३३-४५.
९. गुप्ता, आर. (२०१७) आदिवासी महिलांच्या सक्षमीकरणात कौशल्य विकास योजनांची भूमिका. महिला आणि विकास जर्नल, १२ ४ . पृ. १३४-१४६.

BODHIVRUKSHA JOURNAL OF DIVERSE DISCIPLINE (BJDD)
An Open-Access, Peer-Reviewed, Multidisciplinary Scholarly Journal | Bi-Monthly | Multilingual | Academic Research
Vol 2, Issue 6 (November-December 2026) (Special Issue 2) | ISSN: 3139-1486 (Online) | ISSN: 3139-9819 (Print)

१०. शर्मा, पी. आणि जोशी, पी. (२०२०) आदिवासी भागातील सांस्कृतिक आणि शैक्षणिक सुधारणा. आदिवासी संस्कृती आणि शिक्षण प्रक्रिया, २२ (५). पृ. १४५-१५८.
११. कुमार संतोष / अंग्राल शीतल/ मादिहा इक्बाल. PIB प्रेस माहिती ब्युरो माहिती व प्रसारण मंत्रालय भारत सरकार
१२. ठाकूर, देवेंद्र आणि डी. एन. ठाकूर (संपादक). (1994). Tribal Settlement and Minor Forest Produce. नवी दिल्ली: Deep & Deep Publications.
१३. सरवनन, वेलायुथम. (2018). Environmental History and Tribals in Modern India.
१४. मेनन, टी. माधव. (2020). Tribal Development in India: From Despair to Hope. नवी दिल्ली: B. R. Publishing Corporation.

शासकीय अहवाल व अधिकृत संकेतस्थळे:-

१. भारत सरकार, आदिवासी कार्य मंत्रालय. प्रधानमंत्री जनजाती आदिवासी न्याय महाअभियान (PM-JANMAN). अधिकृत संकेतस्थळ.

२. भारत सरकार, आदिवासी कार्य मंत्रालय. धरती आबा जनजातीय ग्राम उत्कर्ष अभियान.

३ . भारत सरकार, आदिवासी कार्य मंत्रालय. लघु वनउपजासाठी किमान आधारभूत किंमत योजना

४. भारत सरकार, आदिवासी कार्य मंत्रालय. लघु वनउपजासाठी किमान आधारभूत किंमत योजना.

५. महाराष्ट्रातील वन्य व आदिवासी विकास विभाग, (www.maharashtra.gov.in. p 2)

६. ओळख महाराष्ट्राची, विदर्भ --एक दृष्टिक्षेप; (२७ मे २०१९) पृष्ठ क्र.२

७. भारत सरकार, आदिवासी कार्य मंत्रालय. अनुसूचित जमाती आणि इतर पारंपरिक वननिवासी (वनहक्कांची मान्यता) अधिनियम, २००६.

८. भारत सरकार, आदिवासी कार्य मंत्रालय. पेसा कायदा, १९९६ आणि संबंधित कायदे.

९. भारत सरकार, आदिवासी कार्य मंत्रालय. (2024–25). Scheme-wise Sanction Order and Financial Summary. आदिवासी कार्य मंत्रालयाची निधीविषयक आकडेवारी

१०. भारत सरकार, पर्यावरण, वन व हवामान बदल मंत्रालय. (2024–25). Annual Report 2024–25. पर्यावरण, वन व हवामान बदल मंत्रालय